# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय विरार

दि.३१/०७/२०२३

## <u>प्रेसनोट</u>

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत मागील वर्षी ज्या प्रमाणे **"घरोघरी तिरंगा"** हे अभियान राबविण्यात आले होते, त्याच धर्तीवर केंद्र शासनाच्या Ministry Of Youth Affairs And Sports Department of Youth Affairs यांनी निर्गमित केलेल्या सुचनेनुसार दि.०९ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट २०२३ पर्यत **"माझी माती, माझा देश"** हे अभियान राबविण्यात येणार आहे. शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार शहरी भागामध्ये सदरचे अभियान हे दिनांक दि.०९ ऑगस्ट ते २० ऑगस्ट २०२३ पर्यत राबविण्यात येणार आहे.

**अभियानाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार पाच उपक्रम राबविण्यात येणार आहेत, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.**

1) **शीलाफलकम** -
या अनुषंगाने महानगरपालिका क्षेत्रातील स्वातंत्र्य सैनिक/होतात्म्य प्राप्त शूरवीर यांच्या सन्मानार्थ ०९ प्रभाग समिती अंतर्गत अमृत सरोवर/तलावाशेजारी शिला फलक बसविण्यात येणार आहेत, ज्यामुळे आपल्या स्वातंत्र्य सैनिक व वीरांचे कार्य व बलिदान सदैव आपल्या स्मरणात राहील.

2) **पंचप्राण प्रतिज्ञा + सेल्फी**
या अनुषंगाने हातामध्ये माती किंवा मातीचा दिवा घेऊन राष्ट्रउभारणीसाठी वचन देणारी पंचप्राण प्रतिज्ञा घेण्यात येणार आहे व सदर प्रतिज्ञा घेतानाचे सेल्फी/फोटो अभिनयाच्या संकेतस्थळावर https://yuva.gov.in/meri_maati_mera_desh वर अपलोड करण्यात येणार आहेत. नागरिक, सेवाभावी संस्था, शैक्षणिक संस्था यांनी सुध्दा मोठ्या संख्येने पंचप्राण प्रतिज्ञा घेऊन,फोटो (सेल्फी) उपरोक्त संकेतस्थळावर अपलोड करावे.

3) **वसुधा वंदन** – या अनुषंगाने महानगरपालिका क्षेत्रामधील प्रत्येक प्रभाग समिती अंतर्गत प्रत्येकी ७५ भारतीय जातीच्या रोपांची लागवड करण्यात येणार असून "**अमृत वाटिका**" तयार करण्यात येणार आहे, यामुळे पर्यावरणाचा संवर्धन व समतोल राखला जाईल हा या मागचा उद्देश आहे.

4) **वीरो का वंदन** – या अनुषंगाने अभियान कालावधीत घेण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमामध्ये महानगरपालिका क्षेत्रातील संरक्षण कर्मचारी/केंद्रीय सशस्त्र पोलिस दल कर्मचारी/ राज्य पोलिस कर्मचारी/ स्वातंत्र्य सैनिक/ शुरवीरांच्या कुटूंबीयांचा सन्मान करण्यात येणार आहे.

5) **राष्ट्रध्वज फडकवणे आणि राष्ट्रगान गायन** – या अनुषंगाने अभियान कालावधीत घेण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमामध्ये राष्ट्रध्वज फडकविण्यात येणार असून समुह राष्ट्रगान गायन करण्यात येणार आहे.

या अभियानाच्या अनुषंगाने नागरिक, सेवाभावी संस्था, शैक्षणिक संस्था, ट्रस्ट, संघटना यांनी  सुद्धा आपल्या स्तरावर उपरोक्त कार्यक्रमाचे आयोजन करून मोठ्या प्रमाणात आपला सहभाग नोंदवावा.

मुख्य कार्यालय विरार
वसई विरार शहर महानगरपालिका